साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

भाग - १

**UGC Care Listed Journal**

**ISSN 2231 - 573X**

◆ संपादक ◆

**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३१४०३, मो. ९९०४००३९९८

Sakri (Dhule)

PRINCIPAL
S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/2009 - TC

वर्ष १४ वे, अंक - ४ था जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

## यशवंतराव चव्हाण विशेषांक

◆ संपादक ◆

डॉ. शिवाजी हुसे

◆ अतिथि संपादक ◆

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

डॉ. राजकुमार मरे

◆ संपादक मंडळ ◆

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. राजकुमार मुसणे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. सुखदेव इगारे
डॉ. सुधाकर जाधव
डॉ. दिलिप बिरुटे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम


मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या संपादक सहमत असतीलच असे नाही, या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३१४०३, मो. ९९०४००३९९८

Sakri (Dhule)

PRINCIPAL
...S.S's.Smt.V.U.Patil Arts &
... Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule



# १४. यशवंतराव चव्हाण : सुसंस्कृत राजकारणाचा वसा व वारसा

**डॉ. शरद बाबुराव सोनवणे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील
कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे.

**प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय जडणघडणीमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रस्थानी आहे. यशवंतराव चव्हाण यांचे नाव स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासामध्ये सुवर्ण अक्षरांनी लिहिले गेलेले आहे. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या विश्व तर चव्हाण यांचे कर्तुत्व केवळ राजकारणापुरतेच मर्यादित न राहता त्यांनी समाजकारण, सहकार, शिक्षण, भाषा, साहित्य आणि संस्कृती अशा मानवी सभ्यतेच्या सर्वांगीण विकासाशी निगडित सर्वच क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या दृष्टीने त्यांच्या कर्तृत्वास क्षितिजाची सीमा नव्हती असे म्हटले तर चूक ठरू नये. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कर्तृत्वाचा ठसा केवळ महाराष्ट्राच्या राजकारणापुरताच सीमित राहिला नाही तर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र धोरण या महत्त्वपूर्ण खात्यांबरोबरच उपपंतप्रधान पदावर देखील आपल्या कार्यकर्तृत्वाची मोहोर उमटवली. राष्ट्रीय राजकारणात इतर राजकारण्यांना मार्गदर्शक ठरेल अशी कर्तुत्वाची आमिट छाप त्यांनी पाडली. सर्वगुण संपन्न, चारित्र्यवान, दूरदृष्टी आणि कुशल संघटक असलेल्या या लोकनेत्याच्या राजकीय कार्यकर्तृत्वाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधणेबंधात केला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांची राजकारणाची दिशा**

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीचा महाराष्ट्राचा राजकीय इतिहास ब्राह्मण वर्चस्वाचा असल्याचे दिसते. वर्ण व्यवस्थेतील उच्च दर्जा, ज्ञान क्षेत्रावरील वर्चस्व आणि प्रशासकीय सत्तेवरील ताबा ही परिस्थिती ब्राह्मण वर्चस्व अबाधित राहण्यास अनुकूल होती. परंतु ब्रिटिश सत्तेच्या काळात ब्राह्मण जातीला राजकीय स्पर्धा निर्माण होऊ लागली होती. खऱ्या अर्थाने, 'ब्राह्मण वर्चस्वाचा वैचारिक प्रतिवाद सर्वप्रथम 19 व्या शतकात महात्मा फुले यांनी केला. त्यांच्या सत्यशोधक समाजापासून संघटनात्मक पातळीवर ब्राह्मण वर्चस्वाचा प्रतिवाद होऊ लागला. पुढे ब्राह्मणेतर चळवळीने या प्रक्रियेला गती दिली.'[1] ब्राह्मणेतर चळवळीच्या अंतर्गतच संख्येने मोठा व पुढारलेल्या शेतकरी जातीचा गट हा 'मराठा' म्हणून आकाराला येत गेला. तरीही महाराष्ट्राच्या राजकारणावरील ब्राह्मण वर्चस्व लगेच कमी झाली नव्हते. 'स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्र काँग्रेस ही गुजराती, ब्राह्मण आणि विदर्भातील मारवाडी नेतृत्वाच्या नियंत्रणात होती.'[2] त्यामुळे मराठा नेतृत्वाने काँग्रेसपासून अलिप्त राहून राजकारण करण्यावर भर दिला होता. 1920 मध्ये महात्मा गांधींच्या राष्ट्रीय काँग्रेसमधील आगमनानंतर त्यांनी राष्ट्रीय काँग्रेस अधिकाधिक जनताभिमुख करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीमध्ये ग्रामीण जनतेचा सहभाग वाढविण्यावर भर दिल्यामुळे मराठा नेतृत्व काँग्रेसमध्ये सहभागी झाले.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.B.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

काँग्रेसमध्ये गेल्यावर प्रदेश काँग्रेसचे नियंत्रण पूर्णपणे ताब्यात घेणे मराठा नेतृत्वाला शक्य झाले नाही. त्यामुळे ब्राह्मणेत्तर समाजाचे राजकारण स्वतंत्रपणे करण्याच्या हेतूने बरेच मराठा नेते काँग्रेस मधून बाहेर पडले व त्यांनी 'शेतकरी कामगार पक्ष' हा नवा पक्ष स्थापन (1948) केला.[3] अशा निर्णायक परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात काँग्रेस पक्षाचे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेऊन, केवळ एका प्रादेशिक जातीसमूहाचे राजकारण करण्याचे नाकारून त्यांनी महाराष्ट्रातील सर्व शेतकरी जाती, बहुजन समाज आणि एकूणच सर्वसामान्य जनता यांचे सर्वसमावेशक राजकारण व नेतृत्व करण्याचे ठरवून राष्ट्रीय राजकारणाच्या प्रवाहाचा एक भाग बनण्यास प्राधान्य देऊन काँग्रेस पक्षातच राहणे पसंद केले.

**यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार**

एक नोव्हेंबर 1956 रोजी विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होऊन त्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. परंतु पुढे मुंबई सह मराठी भाषिक प्रदेशाचे वेगळे महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे या मागणीसाठीचा लढा अधिक तीव्र झाला आणि काँग्रेसच्या विरोधी पक्षांनी एकत्र येऊन 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन केली. 1957 च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला मराठी भाषिक प्रदेशात हर भक्कम यश मिळाल्यामुळे यशवंतराव चव्हाण यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ऑगस्ट 1959 मध्ये काँग्रेस षर्षीना असे कळविले होते की, 'द्विभाषिक राज्याचा कारभार यशस्वी होत असला तरी राज्यातील जनतेत एकात्मतेची भावना निर्माण झालेली नाही, म्हणून मुख्यमंत्री या नात्याने हे राज्य मी यापुढे चालू शकणार नाही.'[4] यावरून असे स्पष्ट होते की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस यशवंतराव चव्हाण यांचा पाठिंबाच होता. परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे या पाठीमागील त्यांचा उद्देश आणि दृष्टिकोन देखील विशुद्ध स्वरूपाचा होता.संयुक्त महाराष्ट्र हे केवळ त्यांच्यासाठी साध्य नव्हते तर सामाजिक एकता आणि समता प्रस्थापनेचे ते साधन होते. महाराष्ट्राच्या सर्व समस्या या भारताच्या समस्या आहेत असे समजून त्यांचे निराकरण झाले पाहिजे आणि या राज्यात भारताचा एक अंतर्गत घटक समजून त्याचा विकास झाला पाहिजे, ही प्रांजळ भूमिका यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस पाठिंबा देताना व्यक्त केली होती.[5] पक्षीय राजकारणाच्या संदर्भातकाँग्रेसला प्रतिकूल असणाऱ्या या काळात यशवंतरावांनी काँग्रेसला नव संजीवनी प्राप्त करून दिली. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात काँग्रेसची खडी नव्याने बसवुन सामाजिक अंतरायांवर भर देण्याऐवजी बहुविध सामाजिक घटकांना बरोबर घेऊन त्यांना सत्तेत वाटा देण्यासंबंधी त्यांची आग्रही भूमिका होती. त्यामुळे सामाजिक अंतरायावरच राजकारण करू पाहणाऱ्या पक्षांच्या राजकारणावर मर्यादा पडल्या आणि महाराष्ट्रातील काँग्रेस ही विकास, सहमती आणि लोक कल्याणाच्या आधारावर राजकारण करत असल्याची चित्र निर्माण झाले.[6]

1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली आणि त्याचे श्रेय काँग्रेसला मिळाले आणि संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. महाराष्ट्र राज्याची निर्मितीच्या पद्धतीने झाली तिचा विचार करीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे, लोकशाही पद्धतीला अनुसरून आणि भारतीय संदर्भांशी सुसंगत अशा रीतीने आणि वाटाघाटीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे अनुकूल वातावरण या राज्याला जन्मापासून लाभलेले असून त्यास यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व बहुतांशी कारणीभूत आहे यात दुमत नाही[7] मुंबईसह मराठी भाषेत प्रदेशाचे



Smt. V.U. Patil Arts and Late Dr. B.S. Desale Science College Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यावर काहींनी टीका केली होती व त्यांचा असा आक्षेप होता की, 'संयुक्त महाराष्ट्र राज्य हे 'मराठा' वर्चस्व असलेले राज्य होईल.' या टीकेला उत्तर देताना यशवंतरावांनी स्पष्टपणे जाहीर केले होते की, 'महाराष्ट्र राज्य हे मराठा राज्य होणार नाही तर ते मराठी जनतेचे राज्य होईल.' महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेसचे स्वरूप सर्वसमावेश करण्यावर भर दिल्यामुळे 1960 नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घ काळापर्यंत काँग्रेस पक्षाची पकड राहिली.[8] महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतरावांनी काँग्रेस पक्षाचे सारथ्य दूरदृष्टीने केले आणि लोकशाही पद्धतीने कारभार करून विरोधी पक्षांचा व त्यांच्या मतांचा देखील सन्मान केला. त्यांनी सहकार चळवळ आणि स्थानिक शासन या माध्यमातून समाजाच्या सर्व घटकांमध्ये सत्तेचे वाटप व विकेंद्रीकरण करून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस संघटना अधिक भक्कम व मजबूत पायावर उभी केली. यामुळे यशवंतराव चव्हाण यांची प्रतिमा बहुजनवादी नेतृत्व अशी बनली व त्यांचे सर्व समावेशक नेतृत्व पुढे आले.

यशवंतरावाच्या राजकीय जीवनातला 1956 ते 1969 हा कालखंड सर्वात यशस्वी समजला जातो.[9] कारण 1956 ते 1962 या कालावधीत त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविले. यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या उन्नतीचे एक स्वप्न पाहिले होते, त्याला अनुसरूनच एकदा सांगली येथे भाषण करताना ते म्हणाले होते की, 'नवमहाराष्ट्राचा भाग्योदय मला माझ्या नजरेसमोर दिसत आहे, थोडी लांबची वाटचाल करावी लागेल, वाट अवघड आहे, कष्ट कमी नाहीत, पण यश मात्र निश्चित आहे.[10] या स्वप्नपूर्तीच्या दिशेने पुढचे पाऊल म्हणून त्यांनी महाराष्ट्रात सर्वच क्षेत्रात गुणवत्तेस प्राधान्य देण्याचे ठरविले होते. यासंदर्भात सांगली येथील भाषणात त्यांनी असे मत प्रतिपादन केले होते की,' महाराष्ट्रात गुणांची अवहेलना केली जाणार नाही, कुठल्याही क्षेत्रात, सत्तास्थानात, निवडणुकीत गुणवत्तेचे महत्त्व कायम टिकविले जाईल अशी माझी काही आहे. त्याशिवाय महाराष्ट्राचे भले आपण करू शकणारच नाही अशी माझी श्रद्धा आहे.'[11] या विधानावरून त्याच्या सुसंस्कृत राजकारणाची दिशा प्रतिबिंबित होते. म्हणूनच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या या भूमिपुत्रास आधुनिक महाराष्ट्राचा शिल्पकार असे संबोधने अगदी रास्त आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय राजकारणातील कार्यकर्तृत्व**

महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचा हुकमी शिलेदार म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे अभेद्य नेतृत्व प्रस्थापित झाले होते.त्यामुळे दिल्ली दरबारी असलेल्या काँग्रेस श्रेष्ठींना याची दखल घेणे अपरिहार्य ठरले. पर्यायाने चीनच्या आक्रमणानंतर यशवंतराव चव्हाण यांची भारताचे संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती झाली. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला' असे या घटनेचे वर्णन करण्यात आले.' दिल्लीला आल्यावर 1962 च्या प्रारंभी यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय महत्त्व वाढतच गेले. संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र या चार महत्त्वाच्या खात्याचा कारभार त्यांनी सांभाळला. गृहमंत्री असताना ते दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले आहेत अशी भावना सर्वत्र निर्माण झाली होती. दिल्ली दरबारातील यशवंतरावांच्या या प्रभावाची तुलना त्यांच्या अनेक स्नेही महादजी शिंदे यांच्याशी करू लागेल होते.'[12]

लालबहादूर शास्त्री यांच्या मृत्यूनंतर पंतप्रधान कोणाकडे जाणार याविषयी अनेक तर्क वितर्क चालू असताना अनेकांनी त्या दृष्टीने प्रयत्न चालविले होते. मात्र यशवंतराव चव्हाण यांनी या स्पर्धेत उतरण्यास नकार देताना आपल्या सहकाऱ्यांना सांगितले होते की, "अशा अडचणीच्या वेळी देशातील जनतेच्या भावना श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पाठीशी जेवढ्या राहतील तेवढ्या अन्य



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

कोणत्याही नेत्याच्या पाठीशी राहणे शक्य नाही. इंदिरा गांधी या पंडित नेहरूंच्या कन्या असून त्यांनी कॉंग्रेस संघटनेचे कार्य आणि पंडितजींचे देश चालविण्याचे कसब अगदी जवळून पाहिलेले आहे. मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द देखील वाखानण्यासारखी राहिलेली आहे. म्हणून कॉंग्रेस अभंग ठेवायची असेल आणि देशात चलबिचल होऊ नये असे वाटत असेल तर इंदिरा गांधी यांनाच पाठिंबा द्यायला हवा."[13] यामधून यशवंतरावांच्या वैयक्तिक स्वार्थाला तुच्छ मानून देशहिताला प्राधान्य देणाऱ्या मनाच्या मोठेपणाची प्रचिती येते.

कॉंग्रेसच्या बंगरूळ (1969) अधिवेशनात इंदिरा गांधींचे मोरारजी देसाई, स.का.पाटील, अतुल्य घोष, निजलिंगप्पा यांच्याशी तीव्र मतभेद झाल्यामुळे कॉंग्रेसचे 'इंडिकेट कॉंग्रेस' व 'सिंडीकेट कॉंग्रेस' असे विभाजन झाले. इंदिरा गांधी यांनी कॉंग्रेसचे राष्ट्रपती पदाचे अधिकृत उमेदवार श्री.संजीव रेड्डी यांचा पराभव घडवून आणला. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्र कॉंग्रेसने संजीव रेड्डींना पाठिंबा दिल्यामुळे यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधी यांच्यातील संबंध बिघडले. अशा परिस्थितीतच सिंडिकेट कॉंग्रेसने इंदिरा गांधी यांच्या जागी यशवंतराव चव्हाण यांना पंतप्रधान पदाची ऑफर दिली होती. मात्र यशवंतरावांनी त्यास नकार दर्शविला व सांगितले की, "पंतप्रधानपद आपापसात भांडून मिळविले तर हा देश नीटनेटका चालविणे अशक्य होईल. उत्तर विरुद्ध दक्षिण, ब्राम्हण विरुद्ध मराठा, क्षत्रिय, जाट, राजपूत असे गट तट पाडून भारत देशाचा कारभार चालविणे हिताचे ठरणार नाही. विरोधकांना कॉंग्रेसमध्ये आणखी किती फूट हवी आहे. मी माझ्या हाताने ती फूट पडू देणार नाही. घटकेच्या पंतप्रधानपदाची मला ओढ नाही."[14] यावरून एक गोष्ट अगदी उघडपणे स्पष्ट होते, ती म्हणजे यशवंतराव चव्हाण हे कधीच संधीसाधू राजकारणी नव्हते. त्यांनी सदैव राष्ट्रहित महत्त्वाचे मानले होते.

इंदिरा गांधी यांनी 1971 मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेऊन प्रचंड बहुमत संपादन केले. याच निवडणुकीसाठी महाराष्ट्रात तिकीट वाटप करताना यशवंतरावांना कमकुवत करण्यासाठी मराठा उमेदवार विशेषतः पाटील व देशमुख यांना वगळण्याचे प्रयत्न झाले. या परिस्थितीत देखील यशवंतराव चव्हाण यांची सहनशीलता, स्थितप्रज्ञवृत्ती आणि सचोटी या गुणांचे सर्वांना प्रत्यंतर आले. वस्तूतः विरोध आणि संघर्ष हा यशवंतरावांचा पिंड नव्हता. त्यांच्या स्वभावात तडजोडीचा भाग अधिक होता. त्यांच्या मते दिल्लीशी भांडून-तंडून महाराष्ट्राची प्रगती साधता येणार नाही. म्हणून मुख्य प्रवाहापासून महाराष्ट्र अलग पडता कामा नये असे त्यांना वाटायचे.

श्रीमती इंदिरा गांधींनी लागू केलेल्या आणीबाणीच्या विरोधात लोकशाहीर रक्षणाच्या मुद्द्यावर कॉंग्रेस विरोधी पक्ष एकत्र आले व जनता पक्षाची निर्मिती झाली. 1977 च्या निवडणुकीत जनता पक्ष केंद्रात सत्तारूढ झाला. पण अल्पावधीतच मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता सरकार कोलमडून चरणसिंह यांच्या नेतृत्वात नवे सरकार स्थापन झाले व या सरकारमध्ये यशवंतराव चव्हाण यांची उपपंतप्रधानपदी वर्णी लागली. त्यांच्या या निर्णयाबद्दल त्यांच्यावर खूप टीका झाली. अनेकांना त्यांचा हा निर्णय आवडला नाही.[15] पुढे यशवंतरावांना या निर्णयाचा पश्चातापही झाला आणि त्याचे सल त्यांना कायम बोचत राहिले

1 जानेवारी 1978 मध्ये इंदिरा कॉंग्रेसची स्थापना केल्यावर इंदिराजी आणि यशवंतराव अलग झाले आणि एकमेकांच्या विरोधातील गटात काम करू लागले. परंतु इंदिरा कॉंग्रेसने इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली निवडणुका जिंकल्यावर यशवंतरावांना वाटू लागले की, कॉंग्रेसचा मुख्य प्रवाह तो झाला असून आपण मुख्य प्रवाहापासून अलग होऊ लागलो आहोत. कॉंग्रेस(एस) ला जनतेने



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

फारसा पाठिंबा न दिल्यामुळे यशवंतराव नाराज झाले होते. काँग्रेस पक्ष चालविण्याचा, वाढविण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न करून देखील त्यांना म्हणावे तेवढे यश येऊ शकले नव्हते. त्यामुळे त्यांची अशी धारणा झाली की, आपण काँग्रेसच्या मुख्य प्रवाहापासून (इंदिरा काँग्रेस) दूर राहून काँग्रेसची, जनतेची व देशाची चांगली सेवा करू शकणार नाही. म्हणून इंदिरा काँग्रेसमध्ये सामील होऊन त्या मुख्य प्रवाहाबरोबर राहून संघटनात्मक कार्य करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.[16] मुळात यशवंतराव चव्हाण हे काँग्रेस पक्षाचे एक निष्ठावान कार्यकर्ते होते. त्यांनी लोकहित व राष्ट्रहित नजरेसमोर ठेवूनच आपला राजकीय प्रवास केला आणि यासाठी त्यांनी राष्ट्रीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहून राजकारण करण्याचे सुरुवातीपासूनच नाकारले होते. यशवंतरावांनी उदात्त हेतूने इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर 1981 ते 1984 या काळात त्यांची कुचंबना झाली. त्यांच्या व्यक्तिमत्वाला शोभेल असे मानाचे पद तर त्यांना दिले गेले नाहीच, उलट त्यांना कमी लेखण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या निधनानंतर इंदिरा काँग्रेसची धुरा सांभाळणारे त्यांचे पुत्र राजीव गांधी यांनी देखील यशवंतराव चव्हाण यांचे महत्त्व जाणले नाही. अशा कुचंबनेमुळे यशवंतरावांचे मानसिक स्वास्थ्य खालावत गेले. अशा अवस्थेतच त्यांचा आजार एकाएकी वाढला आणि दिल्लीच्या हॉस्पिटलमध्ये त्यांची प्राणज्योत मावळली आणि त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला पूर्णविराम दिला. मात्र त्यांनी दाखवलेल्या संस्कृत राजकारणाच्या दिशा व मार्ग आजही देशातील विशेषतः महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पुढाऱ्यांसाठी मार्गदर्शक आहेत.

## सारांश व निष्कर्ष

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्य कर्तृत्वाचे सिंहावलोकन करताना असे म्हणता येईल की, त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यामध्ये सत्ताप्राप्तीसाठी तत्वांशी, जनहिताशी आणि देशहिताशी कधीच तडजोड केली नाही. त्यांनी आपल्या निष्ठेशी कधीच बेईमानी केली नाही. विरोधकांच्या टीका खिलाडूवृत्तीने सहन करून त्यांच्याशी वैरभाव न ठेवता मैत्रीभावाने वर्तन करणारा मनाचा मोठेपणा यशवंतरावांकडे होता. टीकाकारांशी सुड भावनेने न वागता त्यांना प्रांजळ उत्तर देण्याचा उमदेपणा यशवंतरावांकडे होता. आपल्या संबंध राजकीय वाटचालीतून सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श भावी पिढ्यांसाठी घालून दिलेला आहे.

## संदर्भ


1. सुहास पळशीकर, जात व महाराष्ट्रातील राजकारण, सुगावा प्रकाशन, पुणे, 2003, पृ.15
2. कित्ता, पृ.17
3. कित्ता, पृ.18
4. वि. वि. पाटील (संपा.), यशवंतराव चव्हाण : समग्र साहित्य सूची, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, 2003, पृ.181
5. उपरोक्त क्र.2, पृ.6
6. सुहास पळशीकर व सुहास कुलकर्णी (संपा.), महाराष्ट्रातील सत्ता : संघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे,2007, पृ.13
7. 'ना. र. देशपांडे - महाराष्ट्राच्या राजकारणातील समस्या' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती, नागपूर, 1961, पृ.31





Sakri (Dhule)

PRINCIPAL
P.S.S's Sri V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

8. उपरोक्त क्र.1, पृ.13

9. 'विठ्ठलराव गाडगीळ - कृष्णाकाठ : यशवंतरावांच्या राजकीय प्रवासाचा उष:काल', बा. ह. कल्याणकर (संपा.), युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण, समाज विज्ञान प्रबोधिनी, औरंगाबाद, पृ.131

10. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती, नागपूर, 1961, पृ.30

11. कित्ता, पृ.51

12. उपरोक्त क्र.12, पृ.132

13. अनंतराव पाटील - 'असा नेता होणे नाही', बा. ह. कल्याणकर (संपा.), युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण, समाज विज्ञान प्रबोधिनी, औरंगाबाद, पृ.41

14. कित्ता, पृ.42

15. कित्ता, पृ.44

16. कित्ता, पृ.45,46



Sakri (Dhule)

PRINCIPAL